**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.**

---

क्र. कोविमं/माध्य. परीक्षा/ ४३५९
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक : १२/ ०८/ २०२०

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा.

**विषय : मार्च २०२० माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या मूळ गुणपत्रिका वितरणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, मार्च २०२० मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या शाळेमार्फत प्रविष्ट झालेल्या नियमित, खाजगी, श्रेणीसुधार, पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख, यांचे वाटप माध्यमिक शाळांना **सोमवार दिनांक १७/०८/२०२० रोजी सकाळी ११.०० वा मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रांमार्फत करण्यात येणार आहे.** याची सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी. साहीत्य घेऊन जाणेसाठी आपल्या अधिकारपत्रासह आपल्या शाळेचा प्रतिनिधी पाठवून साहीत्य घेऊन जाणेची दक्षता घ्यावी. **गुणपत्रिकांचे वाटप त्याच दिवशी दिनांक १७/०८/२०२० रोजी दु.३.०० वा.विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करावयाचे आहे.**

संबंधित शाळांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार व सोईनुसार शासनाच्या व आरोग्य विभागाच्या सर्व नियमांचे व सूचनांचे पालन करुन गुणपत्रक वितरण करावे. विद्यार्थ्यांना विशिष्ट तारखेस गुणपत्रक घेऊन जाणेस आग्रह धरु नये. तसेच शाळेमध्ये पालक / विद्यार्थी यांची एकाच वेळी गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन नियोजन करावे.

गुणपत्रिका विद्यार्थ्यांना हस्तपोहोच देण्यापूर्वी शाळेच्या अभिलेखावरुन पडताळणी करुन **नावांतील स्पेलिंग, विषय इत्यादी सर्व माहिती बरोबर असल्याची व गुणपत्रिकेत विभागीय सचिवांची स्वाक्षरी असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे.** त्रुटी असणारे गुणपत्रक कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये. गुणपत्रकात कोणतीही त्रुटी असल्यास तसेच गुणपत्रकाची संख्या कमी अधिक असल्यास विनाविलंब मंडळाशी संपर्क साधावा. **त्रुटी असणाऱ्या गुणपत्रिका मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत दिनांक १६/०९/२०२० पूर्वी मंडळाकडून दुरुस्त करुन घेणेबाबत दक्षता घ्यावी. दुरुस्ती प्रस्तावासोबत योग्य ते दुरुस्ती शुल्क तसेच प्रमाणित केलेली माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरच्या पानाची छायांकित प्रत सादर करावी.** तसेच यापूर्वी दुरुस्ती का कळविली नाही याबाबतच्या खुलाशासह जनरल रजिस्टर घेऊन मुख्याध्यापक / प्रतिनिधींनी समक्ष मंडळ कार्यालयात आल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर काही त्रुटी राहिल्यास त्यास आपली सर्वस्वी जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**गुणपत्रिका दुरुस्तीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे:-**

**१) शाळेचे शिफारस पत्र**
**२) मुळ गुणपत्रक**
**३) जनरल रजिस्टरची प्रमाणित छायाप्रत**
**४) लिपिकांनी मुख्याध्यापकांना दिलेला खुलासा (प्रिलिस्ट दुरुस्ती का कळविली नाही याबाबत)**
**५) मुख्याध्यापकांनी मंडळास दिलेला खुलासा.**
**६) दुरुस्ती शुल्क रु.१५०/-**

**पुढील पृष्ठावर**

## ** निकालाच्या वाटपा बाबत महत्वाच्या सूचना **

१) सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, **मार्च-२०२०** परीक्षेचे निकालाचे साहीत्य हे मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रामार्फत वितरीत करण्यात येणार आहे तथापि सध्या सातारा जिल्ह्यात कार्यरतअसणारे मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र **अनंत इंग्लिश स्कूल सातारा** याऐवजी **भारती विद्यापीठाचे डॉ.जे.डब्ल्यु आयर्न अकॅडमी, सातारा येथे जावळी, खटाव, कोरेगांव, सातारा** या **०४ तालुक्यांचे निकाल वाटप करण्यात येणार** आहे याची संबंधित तालुक्याच्या शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी व आपले निकालाचे साहीत्य **डॉ.जे.डब्ल्यु आयर्न अकॅडमी, सातारा येथून** घ्यावे.

**२) तसेच सांगली** जिल्ह्यात कार्यरतअसणारे मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र हिज हायनेस राजा चिंतामणराव पटवर्धन हायस्कूल सांगली या **ऐवजी ग.रा.पुरोहीत कन्या शाळा सांगली येथे मिरज व सांगली** या **०२ तालुक्यांचे निकाल वाटप करण्यात येणार** आहे याची संबंधित तालुक्याच्या शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी व आपले निकालाचे साहीत्य **ग.रा.पुरोहीत कन्या शाळा सांगली येथून** घ्यावे.

**३) आपणास प्राप्त झालेल्या मूळ गुणपत्रिका ह्या आपल्याच शाळेच्या आहेत का ? याची काळजीपूर्वक खात्री करावी. जर इतर शाळेच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या पाकिटात सिलबंद करून त्वरित आपल्या विश्वासू प्रतिनिधी मार्फत समक्ष मंडळ कार्यालयाकडे हस्तपोहोच पाठविण्याची व्यवस्था करावी.**

तरी सर्व मान्यताप्राप्त शाळाप्रमुखांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व सूचनांची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत माहितीस्तव :

१. मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.

२. शिक्षणाधिकारी (माध्य.)जिल्हा परीषद, सातारा / सांगली / कोल्हापूर.

# ** प्रकटन **

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांप्रमुखांना कळविण्यात येते की, **मार्च-२०२०** मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा **ऑनलाईन निकाल** मंडळाच्या संकेत स्थळावर **बुधवार दि.२९/०७/२०२० रोजी दु.१.०० वा. जाहीर करण्यात आलेला आहे.**

आता सदर परीक्षेच्या **गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख सोमवार दि. १७/०८/२०२० रोजी सकाळी ११.००** वाजता विभागीय मंडळाकडून नेहमीच्या वितरण केंद्रांवर शाळांच्या प्रतिनिधींना देण्यात येणार असून त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येईल. तसेच सदरचे प्रकटन हे कोल्हापूर विभागीय मंडळाच्या **www.sscboardkolhapur.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्याचे अवलोकन व्हावे व त्यानुसार कार्यवाही करावी.

दिनांक : १२.०८.२०२०

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर